# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
# खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
## नोंदनी क्रमांक – ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

आदेश क्र. जिखप्र/प्रमा-स्वच्छता व भौतिक पायाभूत सूविधा/439/2026
दिनांक- 13/ 01 /2026

**प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

विषय- प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत **"भौतिक पायाभूत सुविधा"** या शिर्षकाखाली काटोल व नरखेड तालुक्यातील गावात पांधन रस्ता बांधकाम करणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

वाचा-
1. भारत सरकार, खाण मंत्रालय, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे सुधारित मार्गदर्शक सुचना दिनांक 15/01/2024
2. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/प्र.क्र.10/उ-9 मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 11/10/2024
3. कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र. जिपना/बांध/का2 (2)/6938 दिनांक 31/10/2025
4. महसूल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्र. लवेसू 2025/प्र.क्र.02/पाणंद रस्ते, मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 14 डिसेंबर, 2025
5. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक 13 /01 /2025 रोजीच्या मंजुर टिपणीनूसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 पत्रान्वये कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, नागपूर यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "स्वच्छता व भौतिक पायाभूत सूविधा" या शिर्षकाखाली काटोल व नरखेड तालुक्यातील गावात गावाअंतर्गत रस्ते बांधकाम करणे या कामाकरीता अंदाजित किंमत **रू.** 1,40,00,000/- **(अक्षरी- रू. एक कोटी चाळिस लक्ष फक्त)** इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच सदर प्रस्तावाचे अंदाजपत्रक सादर त्यास तांत्रिक सहमती प्रदान केलेली आहे. त्याचे तपशिल खालीलप्रमाणे.

संदर्भ क्र. 4 च्या टिपणीनुसार मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान केलेली आहे. त्याचे तपशिल खालील प्रमाणे.

**नियोजित कामांचे विवरण:-**

| अ.क्र. | तालुका | मौजा | कार्यान्वित यंत्रणा | कामाचे विवरण | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरीत 20% निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | काटोल | गंगाल-डोह | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, नागपूर | मौजा गंगालडोह ता. काटोल येथे ढवळापूर रस्त्यापासून ते श्यामसिंग ठाकूर यांचे शेताकडे जाणाऱ्यापांधन रस्त्याचे बांधकाम करणे | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 2 | काटोल | गोंडीमोह गाव | | मौजा गोंडी मोहगाव ता.काटोल येथे संदीप गवळी ते हेमराज कावडकर यांच्या शेतापर्यंतपांधन रस्ता बांधकाम करणे | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | काटोल | गोंडीमोह गाव | | मौजा जटामझरी ता. काटोल येथे सुरेश सावरकर ते संजय मते यांच्या शेतापर्यंत पांधन रस्ता | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 4 | काटोल | चारगाव | | मौजा चारगाव ता.काटोल येथे चंद्रभान परतेती ते सुरेंद्र बागडे यांचे शेतापर्यंत पांधनरस्त्याचे बांधकाम करणे | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 5 | काटोल | चिखली (माळोदे) | | मौजा चिखली (माळोदे) ता.काटोल येथे सुभाष धोटे ते तुकाराम अंबूडारे यांचे शेतापर्यंत पांधन रस्ताबांधकाम करणे | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 6 | काटोल | झिलपा | | मौजा झिलपा ता. काटोल येथे शेषराव चोरे ते शामराव राउत यांचे शेतापर्यंत पांधन रस्ता | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 7 | काटोल | तपनी | | मौजा गोल्लर खापा ता.काटोल येथे किशोर धपके ते कैलाश बोटरे यांचे शेतापर्यंत पांधन रस्त्याचे बांधकाम करणे | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 8 | काटोल | तपनी | | मौजा गोल्लरखापा ता.काटोल येथे श्री हेमराज गजभिये ते श्री संजय धपके यांचे शेतापर्यंत पांधन रस्त्याचे बांधकाम करणे | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 9 | काटोल | मेंडकी | | मौजा मेंडकी ता.काटोल येथे राजेंद्र नेहारे ते मोरेश्वर देहारे पांधन रस्त्याचे बांधकाम करणे | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 10 | काटोल | मेट-पांजरा | | मौजा मेटपांजरा ता. काटोल येथे अशोक भिमटे ते मनोहर हेलोंडे यांचे शेतापर्यंत पांधन रस्ता | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 11 | काटोल | सोनखांब | | मौजा सोनखांब ता.काटोल येथे सोनखांब गावापासून ते लाखोळीगावाकडे जाणारी पांधन रस्त्याचे बांधकाम करणे (3 किमी) | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 12 | नरखेड | मालापूर | | मौजा मालापूर ता. नरखेड येथे ग्रामपंचायत पासून ते श्री अमोल मडके यांचे शेतापर्यंत पांधनरस्ता बांधकाम करणे | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 13 | नरखेड | सावर-गाव | | मौजा सावरगाव ता.नरखेड येथे नानाजी बारई ते रामराव हिरुडकर यांच्या शेतापर्यंत पांधन रस्ता | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| 14 | नरखेड | खेडी गो.गो | | मौजा खेडी गो.गो ता. नरखेड येथे माणिकराव निंबाळकर ते अशोक राउत यांच्या शेतापर्यंत पांधन रस्ता | 1000000 | 200000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (अन्य प्राथम्य बाबी) |
| | | | | एकुण | 14000000 | 2800000 | |

**(अक्षरी- रू. अठ्ठाविस लक्ष फक्त)**

त्याअर्थी संदर्भ क्र. 2 शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) अंतर्गत "भौतिक पायाभूत सूविधा" या **रू. 1,40,00,000/- (अक्षरी- रू. एक कोटी चाळिस लक्ष फक्त)** रकमेच्या कामांस नियामक परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेचा अटीवर प्रशासकीय व वित्तिय मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे. तसेच आदेशातील एकुण प्रशासकीय व वित्तिय मान्यतेच्या 20% निधी **रू. 28,00,000/- (अक्षरी रू. अठ्ठाविस लक्ष फक्त)** या आदेशान्वये वितरित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

1. सदर योजनेबाबत संदर्भ क्र. 4 चे शासन निर्णयानूसार पांधन रस्त्याची कामे करणे आवश्यक राहील.
2. या आदेशान्वये मंजूर केलेल्या कामाचे कार्यादेश वितरित निधीच्या मर्यादेत न देता अंदाजपत्रकीय किंमती एवढया संपूर्ण रकमेचे देण्यात यावे. तसेच या योजनेखाली जी कामे घेण्यात येत आहे. त्या कामांवर कंत्राटदारांना/ पुरवठादारांना अनामत रक्कम किंवा उचल देणे अनुज्ञेय नाही.
3. यंत्र/साहित्य खरेदीसाठी मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्राप्त निधी चालु वित्तिय वर्षातच खर्च करण्यात यावा.
4. जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या कामांची, खरेदी करण्यात आलेली उपकरणे/यंत्रसामुग्रीची व इतर वस्तु/साहित्याची नोंद मालमत्ता नोंदवही/खरेदी नोंदवहीत करणे आवश्यक राहील.
5. कामाचे/ यंत्रसामुग्रीचे/ साहित्याचे परिरक्षण करण्याची जबाबदारी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
6. नियोजित यंत्र/साहित्य खरेदी केल्याचे देयकाची प्रत, यंत्र कार्यान्वित झाल्याचा दाखला, छायाचित्रे, उपयोगिता प्रमाणपत्र व मालमत्ता नोंदवहीत खरेदीचे नोंदी संबंधित अभिलेख्याची प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच या कार्यालयाद्वारे वेळोवेळी विहित केलेली कामांची कागदपत्रे उदा. कामाचा कार्यारंभ आदेशाची प्रत, चालू/अंतिम देयकाची प्रत, मोजमाप पुस्तिकेची हस्तलिखित छायांकित प्रत, काम सुरू होण्यापूर्वी-काम सुरू असतांना-काम पूर्ण झाल्याची फलकासहित (अक्षांश व रेखांक्षसह) मूळ छायाचित्रे (Original Photographs), कामाचे छायाचित्रण (Video), निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, इत्यादी कागदपत्रे निधी मागणीचे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.
7. सदर आदेशातील कामे अर्थसंकल्पात किंवा इतर कार्यक्रमात समाविष्ट नाही याची खात्री करूनच कामास सुरूवात करावी. तसेच सदर कार्यक्रमांतर्गत मंजूर होणारी सर्व कामे ही नविनच होणार असल्यामुळे कामांची पुनरावृत्ती होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी कार्यान्विती यंत्रणेची राहील.
8. काम सुरू करण्यापूर्वी सदर कामे शासकीय जागेवर असल्याची खात्री करूनच कामास सुरूवात करावी. तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांच्या जागेत परस्पर बदल करता येणार नाही, जागेत बदल करावयाचा असल्यास त्यास या कार्यालयाची रितसर पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.
9. कामावर खर्च करण्यापूर्वी कामाचे परिक्षण व देखभालीचे हमीपत्र संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. काम पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या देखरेखीची व परिक्षणाची ज्या शासकीय अभिकरणाकडून हमीपत्र घेतलेले आहे. त्याच अभिकरणाकडे हस्तांतरित करण्यात यावी. तसेच काम पूर्ण झाल्यावर त्याची देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी संबंधित अभिकरणावर राहील व याकरिता वेगळी तरतूद देण्यात येणार नाही.
10. कामनिहाय दर्शविण्यात आलेली तरतूद ज्या कामाकरिता प्रस्तावित आहे. त्याच कामावर आणि मंजूर निधीच्या मर्यादेत खर्च करणे बंधनकारक राहील.

11. सदर आदेशान्वये मंजूर केलेले काम कोणत्याही विकास प्रकल्पामुळे (पाटबंधारे, हायड्रोइलेक्ट्रीक) किंवा अन्य प्रकल्पामुळे बाधीत होणार नाही याची खात्री केल्यानंतरच काम सुरू करावे.
12. प्रस्तावित बांधकाम हे अनाधिकृत अभिन्यासातील नाही किंवा खाजगी जागेवर नाही याची खात्री करूनच कामास सुरूवात करण्यात यावी. करावयाचे बांधकाम जर अनाधिकृत अभिन्यासातील किंवा खाजगी जागेवर असल्याचे आढल्यास अशा स्थळी काम सुरू करणेपूर्वी शासनाची मंजूरी घेणे बंधनकारक राहील याबाबतची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्विती यंत्रणेची राहील.
13. सदर आदेशातील कामे ही वन विभागाच्या जागेवर मोठया झाडांचे जंगल अशा जागेवर असल्यास काम सुरू करण्यापूर्वी संबंधित वन विभागाची/ राज्यशासनाची/ केंद्र शासनाची मंजूरी घेणे बंधनकारक राहील. तसेच मंजूर कामामुळे वनसंवर्धन अधिनियमाचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्विती यंत्रणेची राहील.
14. कामाची बांधकामाधिन जागा नझुलची असल्यास काम सुरू करण्यापूर्वी नझुल विभागाकडून बांधकामाकरिता मंजूरी घेणे बंधनकारक राहील. नझुल विभागाच्या मंजूरीशिवाय कोणत्याही परिस्थितीत कामास सुरूवात करता येणार नाही.
15. रस्ते, पुल, इमारत, इत्यादींची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तसेच पाणी पुरवठयाची व जलसंधारणाची कामे ग्रामविकास विभागाच्या प्रमाणकानुसार व जलसंपदेची कामे जलसंपदा विभागाच्या प्रमाणकानुसार करावी. तसेच सौर ऊर्जा संबंधित कामे महाराष्ट्र शासनाच्या यंत्रणेमार्फत कार्यान्वित करावी. तसेच नियमीत योजनेकरिता लागु असलेले निकष, नियम मर्यादा, धोरण, कार्यपध्दती, इत्यादी सदर कार्यक्रमातील कामांना लागु राहतील.
16. या कार्यक्रमांतर्गत पूर्ण केलेल्या सर्व इमारती/वास्तुची/कामाची नोंद संबंधित कार्यान्विती यंत्रणांनी/संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या मालमत्ता रजिस्टरमध्ये करणे बंधनकारक राहील.
17. **जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत वितरित निधी व खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावे. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर त्यावरील बचतीची रक्कम व्याजासह या कार्यालयास 10 दिवसाचे आत धनादेश/बँक ड्राफ्टद्वारे परत करणे बंधनकारक राहील.**
18. **महालेखाकार कार्यालयाद्वारे घेण्यात येणा-या लेखापरिक्षणाचे वेळी कार्यान्वितयंत्रणांनी आवश्यक अभिलेख/ कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. महालेखाकार यांचे कार्यालयाद्वारे घेण्यात येणाऱ्या लेखापरिक्षणाचे वेळी संपूर्ण सहकार्य करणेबाबतची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखाची राहिल. सदर लेखापरिक्षणाचे वेळी कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याकरीता विभागप्रमुख व्यक्तीश: जबाबदार राहतील.**
19. मंजूर केलेल्या इमारतीच्या किंवा रस्त्याच्या बांधकामास कोणत्याही स्थानिक /खाजगी व्यक्तीचे अथवा मृत व्यक्तीचे नाव देण्यात येवू नये अशा प्रकारच्या कार्यवाहीमुळे उदभवलेल्या तक्रारीची /प्रसंगाची जबाबदारी कार्यान्विती यंत्रणेची राहील.
20. कार्यान्विती अधिकारी यांनी कामावर खर्चाचा मेळ करतांना अहवालांद्वारे कळविण्यात येणा-या खर्चाचे आकडे व या कार्यालयाद्वारे नोंदविलेल्या खर्चाचे आकडे यांच्यात एकवाक्यता राहील याची दक्षता घ्यावी.
21. जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोक लेखा समिती आणि विधीमंडळ कामकाज, इत्यादी बाबींसाठी संबंधीत कार्यान्विती यंत्रणा जबाबदार राहील.

22. जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांची प्रगती समाधानकारक नसल्यास सदर कामे (प्रस्ताव) चे आदेश पुर्व सुचना न देता रद्द करण्याचे व संबंधित अधिका-यांवर प्रचलित नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.
23. अंमलबजावणी करणा-या यंत्रणांनी काम चालु व समाप्तीचा अपेक्षित कालावधी/ दिनांक, बाबतची माहिती या कार्यालयास सादर करावी.
24. योजना /कामे कार्यान्वित करणे, त्याचे सनियंत्रण व देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची किंवा शासकीय अभिकरणाची राहील.
25. जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामाच्या आदेशातील अटी व शर्तीत कोणत्याही वेळी पुर्व सुचना न देता वाढ करण्याचे सर्व अधिकार जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांना राहील.
26. योजनापूर्ण झाल्यावर त्यावर पुन्हा तरतूद केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
27. **या योजनेंतर्गत घेण्यात येणा-या सर्व प्रकारच्या बांधकामच्या तसेच उपकरणे, यंत्राचे दर्शनी ठिकाणी फलक खालील नमूद केल्याप्रमाणे लावण्यात यावे.**

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर**
**नोंदनी क्रमांक:- ई-3342/2017, दिनांक 27/11/2017**
**प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना**

1. **कार्यान्विती यंत्रणेचे नाव:-**
2. **कंत्राटदाराचे नाव:-**
3. **कामाचे नाव:-**
4. **मंजूर वर्ष:-**
5. **मंजूर निधी:-**
6. **काम सुरू झाल्याची तारीख:-**
7. **काम पूर्ण झाल्याची तारीख:-**
8. **झालेला खर्च**

28. योजनेची प्रगती व फलश्रुती अहवाल दर महिन्याला कार्यान्वित यंत्रणेनी जिल्हा खनिज प्रतिष्ठान कडे सादर करणे आवश्यक राहील.
29. निवडणूक आयोगाचे वेळोवेळी निवडणूक संदर्भातील आचारसंहितेचे निर्गमित होणारे आदेश विचारात घेवून योग्य कार्यवाही करण्याचे दक्षता घेण्यात यावी.
30. या कार्यक्रमांतर्गत निर्माण होणा-या वास्तु खरेदी केलेले साहित्य, मालमत्ता सर्वस्वी शासनाच्या मालकीची राहील.
31. **कार्यान्वयीन यंत्रणेने योजनांच्या मासिक खर्चाचे अहवाल प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर ला सादर करणे आवश्यक राहील.**

या आदेशातील परिच्छेद 1 ते 31 मधील अटीच्या अधिन राहून कामे करण्याची संपूर्ण जबाबदारी सबंधित यंत्रणेची राहील.

तसेच सदर मंजुर निधी **रू. 28,00,000/- (अक्षरी रू. अठ्ठाविस लक्ष फक्त)** मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल्स लाईन, नागपूर, बॅक खाते क्र. 60372658232 आय.एफ.सी.कोड MAHB0001321 मध्ये आर.टी.जी.एस द्वारा वितरीत करण्यात येत आहे.

(डॉ. विपीन)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
नियामक परिषद, जिल्हा खनिज प्रतिष्ठान,
नागपूर

प्रत-

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर

प्रतिलिपी :

1. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना माहिती व पुढील कार्यावाहीस्तव अग्रेषीत
2. कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, नागपूर यांना माहिती व पुढील कार्यावाहीस्तव अग्रेषीत

(डॉ. विपीन)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
नियामक परिषद, जिल्हा खनिज प्रतिष्ठान,
नागपूर

जारी करने की तारीख से 3 माह केलिए वैध VALID FOR 3 MONTHS FROM THE DATE OF ISSUE

बैंक ऑफ़ इंडिया Bank of India BOI

रविंद्रनाथ टैगोर रोड शाखा , नागपुर, महाराष्ट्र - 440001
RAVINDRANATH TAGORE ROAD Branch , NAGPUR, MAHARASHTRA - 440001
IFSC : BKID0008709

06012026
D D M M Y Y Y Y
R3586

Pay Yourself for RTGS या धारक को Or Bearer

रुपये Rupees Twenty eight lakh only ——

अदा करें। ₹ 28,00,000/-

खा.सं. A/c No. 870910110004835

चेक प्राप्तकर्ता की आधार संख्या (वैकल्पिक) Cheque receiver's AADHAAR number (optional)

DISTRICT MINERAL FOUNDATION

हमारी सभी शाखाओं पर समाशोधन में देय PAYABLE AT ALL OUR BRANCHES IN CLEARING

Please sign above

जिल्हा खनिकर्म अधिकारी जिल्हाधिकारी, नागपूर

566644 08/08/2025 4835575

SESHAASAI (M) / CTS-2010

⑈385575⑈ 440013009⑆ 005859⑈ 10

**District Mineral Foundation**
A/c No. 870910110004835
**Beneficiary Details**

| S. No. | Agency | Name of Beneficiary | Bank Name | Branch | Account Number | IFSC Code | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Executive Enegineer , construction , Zilha Parishad, Nagpur | Chief Accountant, & Fianance Officer Zilha Parishad Nagpur | Bank Of Maharastra | Civil Line, Nagpur | 60372658232 | MAHB0001321 | 2,800,000 |
| Total | | | | | | | 2,800,000 |

District Mining Officer,
Nagpur

Collector, Nagpur